भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

# अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती आदेश (विशोधन) अधिनियम, १९७६

(सन १९७६ चा अधिनियम क्रमांक १०८)

[१ मार्च, १९८९ रोजी यथाविद्यमान]

# The Scheduled Castes and Scheduled Tribes Orders (Amendment) Act, 1976

## (Act No. 108 of 1976)

[*As in force on the 1st March, 1989*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
१९९१

[किंमत रुपये ६.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च, १९८९ रोजी यथाविद्यमान असलेला दि शेड्युल्ड कास्टस अँण्ड शेड्युल ट्राइब्ज ऑर्डर्स (अमेंडमेंट) अँक्ट, १९७६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १, अंक २, दिनांक ९ जुलै, १९९० यात पृष्ठ १०७ ते १२७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ जुलै, १९९०.

**व्ही. एस. रमादेवी,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Scheduled Castes and Scheduled Tribes Orders (Amendment) Act, 1976 as on the 1st March 1989 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 1, dated 9th July, 1990 on pages 107 to 127.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi, 9th July 1990.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

एच ४४८२—१

# अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती आदेश (विशोधन) अधिनियम, १९७६

---

कलमांचा क्रम

---

कलमे


१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. अनुसूचित जाती आदेशाचे विशोधन.

४. अनुसूचित जनजाती आदेशाचे विशोधन.

५. अनुसूचित जातींची आणि अनुसूचित जनजातींची लोकसंख्या निश्चित करणे.

६. निवडणूक आयोगाने मतदारसंघांचे पुन:समायोजन करणे.

७. आयोगाची कार्यपद्धती आणि त्याच्या शक्ती.

८. विशोधनांचे प्रकाशन आणि ती अंमलात येण्याचे दिनांक.

९. निवडणूक आयोगाच्या अन्य विवक्षित शक्ती.

१०. अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या कृती विधिग्राह्य करणे.

पहिली अनुसूची.

दुसरी अनुसूची.


---

टीप.—या अनुवादामध्ये महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे नामोच्चार हे अनुक्रमे समाजकल्याण विभाग आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांनी प्रमाणित केल्यानुसार आहेत. तसेच इतर राज्यांतील अनुसूचित जाती व जनजाती यांच्या नामोच्चारांबाबत सामान्यपणे हिंदी अनुवाद प्रमाण मानला आहे.

# अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती आदेश (विशोधन) अधिनियम, १९७६

**(१९७६ चा अधिनियम क्रमांक १०८)**

**[ दिनांक १ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान ]**

[ १८ सप्टेंबर, १९७६ ]

**अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती यांच्या याद्यांमध्ये विवक्षित जाती आणि जनजाती समाविष्ट करण्याचा आणि अशा याद्यांमधून विवक्षित जाती आणि जनजाती वगळण्याचा व अशा समावेशामुळे आणि वगळणुकीमुळे जेथवर संसद व विधानसभा मतदारसंघांच्या प्रतिनिधित्वाचे पुनःसमायोजन करणे आवश्यक होत असेल तेथवर, अशा पुनःसमायोजनाचा आणि त्याच्याशी निगडित असलेल्या बाबींचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास 'अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती आदेश (विशोधन) अधिनियम, १९७६' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा *दिनांकास तो अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "जनगणना प्राधिकरण" याचा अर्थ, महा निबंधक आणि त्या नात्याने भारताचा जनगणना आयुक्त असा आहे;

(ख) "आयोग" याचा अर्थ, राष्ट्रपतींनी संविधानाच्या अनुच्छेद ३२४ खाली नियुक्त केलेला निवडणूक आयोग असा आहे;

(ग) "परिसीमन अधिनियम" याचा अर्थ, 'परिसीमन अधिनियम, १९७२' (१९७२ चा ७६) असा आहे;

(घ) "मागील जनगणना" याचा अर्थ, भारतात १९७१ मध्ये केलेली जनगणना असा आहे;

(ङ) "अनुसूचित जाती आदेश" याचा अर्थ, राष्ट्रपतींनी संविधानाच्या अनुच्छेद ३४१ खाली काढलेला 'संविधान (अनुसूचित जाती) आदेश, १९५०' असा आहे;

(च) "अनुसूचित जनजाती आदेश" याचा अर्थ, राष्ट्रपतींनी संविधानाच्या अनुच्छेद ३४२ खाली काढलेला 'संविधान (अनुसूचित जनजाती) आदेश, १९५०' आणि 'संविधान (अंदमान व निकोबार बेटे) अनुसूचित जनजाती आदेश, १९५९' असा आहे;

(छ) "राज्य" याचा अर्थ, अनुसूचित जाती आदेश आणि अनुसूचित जनजाती आदेश यांमध्ये समाविष्ट केलेले राज्य असा आहे, आणि त्यामध्ये अंदमान व निकोबार बेटांच्या संघ-राज्यक्षेत्राचा समावेश होतो.

३. याद्वारे अनुसूचित जाती आदेश हा, पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने आणि तितक्या मर्यादेपर्यंत विशोधित केला आहे. अनुसूचित जाती आदेशाचे विशोधन.

४. याद्वारे अनुसूचित जनजाती आदेश हा, दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने आणि तितक्या मर्यादेपर्यंत विशोधित केला आहे. अनुसूचित जनजाती आदेशाचे विशोधन.

५. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर होईल तितक्या लवकर प्रत्येक राज्यातील अनुसूचित जातींची किंवा, प्रकरणपरत्वे, अनुसूचित जनजातींची लोकसंख्या मागील जनगणनेमध्ये जशी होती तशी जनगणना प्राधिकरणाकडून अजमावली जाईल किंवा अंदाजे ठरवली जाईल. अनुसूचित जातींची आणि अनुसूचित जनजातींची लोकसंख्या निश्चित करणे.

(२) जेव्हा कलम ३ किंवा कलम ४ द्वारे केलेल्या विशोधनामुळे,—

(क) उक्त कलमांमध्ये उल्लेखिलेल्या आदेशांना जोडलेल्या अनुसूचींच्या कोणत्याही भागांमध्ये कोणत्याही जातीच्या किंवा जनजातीच्या संबंधात एखाद्या राज्यातील जो कोणताही स्थानिक भाग विनिर्दिष्ट केला असेल त्याचे क्षेत्र बदलून अशा जातीच्या किंवा जनजातीच्या संबंधात अधिक विस्तृत क्षेत्र विनिर्दिष्ट करण्यात येईल तेव्हा, जनगणना प्राधिकरण मागील जनगणनेमध्ये आणि ज्या तत्पूर्व जनगणने-मध्ये वाढीव क्षेत्राच्या संबंधात त्या जातीची किंवा जनजातीची लोकसंख्या अजमावली होती अशा कोणत्याही पूर्व जनगणनेमध्ये अजमावल्याप्रमाणे त्या जातीची किंवा जनजातीची लोकसंख्या विचारात

*२७ जुलै १९७७—भारताचे राजपत्र, असाधारण, भाग दोन, विभाग ३ (दोन), दिनांक २७ जुलै, १९७७ (पृ. २३९७), एस.ओ. ५८९ (ई) पहा.

येईल आणि उक्त विशोधनाद्वारे ज्याच्या संबंधात अशी जात किंवा जनजाती विनिर्दिष्ट केलेली आहे अशा राज्याची किंवा, प्रकरणपरत्वे, विभागाची, जिल्ह्याची, तालुक्याची, तहसीलाची, पोलीस ठाण्याची, विकास गटाची किंवा अन्य प्रादेशिक विभागाची सर्वसाधारण लोकसंख्या पूर्वोक्त अशी पूर्व जनगणना आणि मागील जनगणना यांच्या दरम्यान ज्या प्रमाणात वाढली असेल किंवा कमी झाली असेल त्या प्रमाणात त्या जातीची किंवा जनजातीची लोकसंख्यादर्शक आकडेवारी वाढवून किंवा कमी करून १ एप्रिल, १९७१ रोजी असल्याप्रमाणे ती लोकसंख्या निश्चित करील.

(ख्) जी कोणतीही जात किंवा जनजाती ही एखाद्या राज्याच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात अनुसूचित जात तसेच अनुसूचित जनजाती म्हणून दोन्ही प्रकारे मानली जाते अशी जात किंवा जनजाती त्या राज्याच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात फक्त अनुसूचित जात किंवा अनुसूचित जनजाती म्हणून विनिर्दिष्ट करून बदल करण्यात येईल तेव्हा, जनगणना प्राधिकरण मागील जनगणनेमध्ये अजमावल्याप्रमाणे अशा अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जनजातीची लोकसंख्या विचारात घेईल :

परंतु, त्या जातीची किंवा जनजातीची लोकसंख्या मागील जनगणनेमध्ये किंवा कोणत्याही तत्पूर्व जनगणनेमध्ये अजमावली नसेल आणि त्या प्राधिकरणाच्या मते ती अगदी अल्प असेल तर, जनगणना प्राधिकरणाने त्या अनुसूचित जातीची किंवा जनजातीची १ एप्रिल, १९७१ रोजी असल्याप्रमाणे जनगणना निश्चित करण्याची आवश्यकता असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—जेव्हा कोणत्याही जातीची किंवा जनजातीची खंड (क्) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही वाढीव क्षेत्राच्या संबंधातील लोकसंख्या मागील एकाहून अधिक जनगणनांमध्ये अजमावलेली असेल तेव्हा, जनगणना प्राधिकरण त्या खंडाच्या प्रयोजनार्थ, मागील जनगणनेला जास्तीत जास्त नजीक असणाऱ्या तत्पूर्व जनगणनेमध्ये अजमावल्याप्रमाणे अशा जातीची किंवा जनजातीची लोकसंख्या विचारात घेईल.

(३) पोटकलम (२) खाली अजमावलेली किंवा निश्चित केलेली लोकसंख्या जनगणना प्राधिकरणाकडून 'भारताचे राजपत्र' यामध्ये अधिसूचित करण्यात येईल.

(४) अशा रीतीने अधिसूचित केलेली लोकसंख्या ही मागील जनगणनेमध्ये अजमावलेली संबद्ध लोकसंख्या असल्याचे मानले जाईल आणि त्यामुळे पूर्वी प्रकाशित झालेली कोणतीही आकडेवारी निष्प्रभावी होईल; आणि अशा रीतीने अधिसूचित केलेली आकडेवारी अंतिम असेल आणि ती कोणत्याही न्यायालयामध्ये प्रश्नास्पद करता येणार नाही.

**निवडणूक आयोगाने मतदारसंघाचे पुनःसमायोजन करणे.**

६. (१) कलम ५ खाली कोणत्याही राज्याची लोकसंख्या दर्शवणारी आकडेवारी अधिसूचित करण्यात आल्यानंतर यापुढे दिल्याप्रमाणे आयोगाने विशोधित केला तसा 'संसदीय व विधानसभा मतदार-संघांचे परिसीमन आदेश, १९७६' यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राखीव जागांच्या संख्येच्या आधारे, त्या राज्याच्या अनुसूचित जातींना किंवा, प्रकरणपरत्वे, अनुसूचित जनजातींना योग्य प्रतिनिधित्व देण्याच्या प्रयोजनार्थ, संविधानाचे अनुच्छेद ८१, १७०, ३३० आणि ३३२ यांचे, परिसीमन अधिनियमाच्या कलम ८ चे आणि या अधिनियमाचे उपबंध विचारात घेऊन, (अशा आदेशामध्ये दिल्याप्रमाणे कोणत्याही मतदारसंघाची व्याप्ती न बदलता) त्या आदेशामध्ये आवश्यक असतील अशी विशोधने करणे हे आयोगाचे कर्तव्य असेल, आणि 'लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०' (१९५० चा ४३) याला जोडलेली पहिली अनुसूची व दुसरी अनुसूची तदनुसार विशोधित झाली असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोटकलम (१) खाली कोणतीही विशोधने करताना, आयोग, आवश्यक असेल तेथवर, परिसीमन अधिनियमातील कलम ९ च्या पोटकलम (१) मधील खंड (ग्) आणि खंड (घ्) चे उपबंध विचारात घेईल.

(३) आयोग—

(क्) आपले विशोधनासंबंधीचे प्रस्ताव 'भारताचे राजपत्र' यामध्ये आणि संबंधित राज्याच्या शासकीय राजपत्रामध्ये आणि स्वतःला योग्य वाटेल अशा अन्य रीतीने प्रकाशित करील;

(ख्) कोणत्या दिनांकी किंवा दिनांकानंतर अशा प्रस्तावांवर आयोग अधिक विचार करील ते विनिर्दिष्ट करील;

(ग्) अशा विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी आयोगाकडे आलेल्या अशा सर्व आक्षेपांचा व सूचनांचा विचार करील; आणि

(घ्) त्यानंतर आदेशामध्ये आवश्यक ती विशोधने करील.

**आयोगाची कार्यपद्धती आणि त्याच्या शक्ती.**

७. (१) या अधिनियमाखाली आपली कर्तव्ये पार पाडीत असताना, आयोग आपली कार्यपद्धती निश्चित करील आणि दाव्याची संपरीक्षा करीत असताना, दिवाणी न्यायालयाला 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली पुढील बाबींसंबंधी असतात त्या सर्व शक्ती त्याला असतील, त्या बाबी अशा :—

(क्) साक्षीदारांना समन्स पाठविणे व त्यांना उपस्थित राहण्यास भाग पाडणे;

(ख्) कोणताही दस्तऐवज हजर करण्यास फर्मावणे; आणि

(ग्) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख मागवणे.

(२) आयोगाला, त्याच्या विचाराधीन असलेल्या कोणत्याही बाबीच्या दृष्टीने, त्याच्या मते उपयुक्त असतील किंवा संबद्ध असतील अशा कोणत्याही मुद्यांवरील किंवा अशा गोष्टींसंबंधीची कोणतीही माहिती एखाद्या व्यक्तीने सादर करावी असे तिला फर्माविण्याची शक्ती असेल.

(३) आयोग म्हणजे 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) याची कलमे ३४५ व ३४६ यांच्या प्रयोजनार्थ दिवाणी न्यायालय असल्याचे मानले जाईल.

**स्पष्टीकरण.**—साक्षीदारांना उपस्थित राहण्यास भाग पाडण्याच्या प्रयोजनार्थ, आयोगाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा म्हणजे भारताच्या राज्यक्षेत्राच्या सीमा असतील.

**विशोधनांचे प्रकाशन आणि ती अंमलात येण्याचे दिनांक.**

८. (१) आयोग 'संसदीय व विधानसभा मतदारसंघांचे परिसीमन आदेश, १९७६' यामध्ये त्याने केलेली विशोधने, 'भारताचे राजपत्र' यामध्ये आणि संबंधित राज्यांच्या शासकीय राजपत्रांमध्ये प्रकाशित करवील.

(२) 'भारताचे राजपत्र' यामध्ये प्रकाशित झाल्यावर, अशा प्रत्येक विशोधनाला कायद्याचे बळ प्राप्त होईल आणि ते कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करता येणार नाही.

(३) 'भारताचे राजपत्र' यामध्ये असे प्रकाशन झाल्यानंतर, होईल तितक्या लवकर, असे प्रत्येक विशोधन लोकसभेपुढे आणि संबंधित राज्यांच्या विधानसभांपुढे ठेवले जाईल.

(४) पोटकलम (५) च्या उपबंधांच्या अधीनतेने, आयोगाने 'संसदीय व विधानसभा मतदारसंघांचे परिसीमन आदेश, १९७६' मध्ये केलेल्या कोणत्याही विशोधनांमुळे जे आवश्यक होईल आणि अशा विशोधित आदेशामध्ये ज्याबाबत उपबंध केला आहे असे, क्षेत्रीय मतदारसंघांच्या लोकसभेतील आणि राज्याच्या विधानसभेतील प्रतिनिधित्वाचे पुनःसमायोजन, अशी विशोधने पोटकलम (१) खाली 'भारताचे राजपत्र' यामध्ये प्रकाशित झाल्यानंतर घेतल्या जाणाऱ्या लोकसभेच्या किंवा, प्रकरणपरत्वे, विधानसभेच्या प्रत्येक निवडणुकीच्या संबंधात लागू होईल आणि 'लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५०' (१९५० चा ४३) मध्ये समाविष्ट असलेल्या प्रतिनिधित्वविषयक उपबंधांना निष्प्रभावी करून याप्रमाणे लागू होईल.

(५) पूर्वगामी पोटकलमांमध्ये समाविष्ट असलेली कोणतीही गोष्ट, या अधिनियमाखाली आयोगाने केलेल्या विशोधनांचे पोटकलम (१) खाली 'भारताचे राजपत्र' यामध्ये प्रकाशन झाल्याच्या दिनांकी विद्यमान असणाऱ्या, लोकसभेतील किंवा एखाद्या राज्याच्या विधानसभेतील प्रतिनिधित्वावर परिणाम करणार नाही.

**निवडणूक आयोगाच्या अन्य विवक्षित शक्ती.**

९. (१) आयोग, वेळोवेळी, 'भारताचे राजपत्र' यामधील आणि संबंधित राज्यांच्या शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे,—

(क) या अधिनियमाखाली विशोधित केल्याप्रमाणे, 'संसदीय व विधानसभा मतदारसंघांचे परिसीमन आदेश, १९७६' मधील कोणतीही मुद्रणाची चूक किंवा कोणत्याही अनवधानाने झालेल्या चूकभुलीमुळे होणारी कोणतीही चूक दुरुस्त करू शकेल ; आणि

(ख) जेव्हा उक्त आदेशामध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही जिल्ह्याच्या किंवा कोणत्याही क्षेत्रीय विभागाच्या सीमा किंवा त्यांचे नाव यात बदल करण्यात आला असेल तेव्हा, हा आदेश अद्ययावत करण्यासाठी स्वतःला आवश्यक किंवा समयोचित वाटतील अशी विशोधने करू शकेल.

(२) या कलमाखालील प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, लोकसभेपुढे आणि संबंधित राज्याच्या विधानसभेपुढे ठेवण्यात येईल.

**अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या कृती विधिग्राह्य करणे.**

१०. जनगणना प्राधिकरणाने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती यांची लोकसंख्या निश्चित करण्यासाठी किंवा आयोगाने मतदारसंघाच्या पुनःसमायोजनासाठी केलेल्या सर्व गोष्टी आणि केलेल्या सर्व उपाययोजना, जेथवर त्या या अधिनियमाच्या उपबंधांनुरूप असतील तेथवर त्या, जणू काही हे उपबंध अशा गोष्टी केल्या जाण्याच्या किंवा अशा उपाययोजना केल्या जाण्याच्या वेळी अंमलात असावेत त्याप्रमाणे या उपबंधांखाली करण्यात आल्या असल्याचे मानले जाईल.

## पहिली अनुसूची

(कलम ३ पहा)

'संविधान (अनुसूचित जाती) आदेश, १९५०' यामध्ये—

(क) परिच्छेद २ यात, "सतरा" या शब्दाऐवजी "एकोणीस" हा शब्द घातला जाईल ;

(ख) परिच्छेद ४ ऐवजी पुढील परिच्छेद घातला जाईल :—

"४. एखादे राज्य अथवा एखादा जिल्हा किंवा त्याचा अन्य प्रादेशिक विभाग यासंबंधी या आदेशात असलेल्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, १ मे, १९७६ रोजी रचना करण्यात आल्याप्रमाणे ते राज्य, तो जिल्हा किंवा तो अन्य प्रादेशिक विभाग यांचा निर्देश म्हणून लावण्यात येईल." ;

(ग) अनुसूचीऐवजी पुढील अनुसूची घालावी :—

## " अनुसूची

### भाग १ ला—आंध्र प्रदेश

१. आदि आंध्र
२. आदि द्रविड
३. अनामुक
४. आरे माल
५. अरुंधतिय
६. अरव माल
७. बारिकी
८. बावुरी
९. बेड जंगम, बुडग जंगम
१०. बिड्ल
११. बैगारा
१२. चचटि
१३. चलवादि
१४. चमार, मोची, मुचि
१५. चंभार
१६. चंडाल
१७. डक्कल, डोक्कलवार
१८. दंडासि
१९. ढोर
२०. डोम, डोम्बार, पैंडी, पनो
२१. एल्लमल्वार, येल्लमालवांडलु
२२. घासी, हड्डी, रेल्लि चचन्डि
२३. गोडागल्ली
२४. गोडारी
२५. गोसंगी
२६. होलया
२७. होलया दासरि
२८. जग्गलि
२९. जम्बुवुलु
३०. कोलुपुलवांडलु
३१. मदासि कुरुवा, मादरि कुरुवा
३२. मादिगा
३३. मादिगादासु, मष्टीन
३४. महार
३५. माला
३६. माला दासरि
३७. माला दासु
३८. माला हृन्न
३९. माला जंगम
४०. माला मस्ति
४१. माला साले, नेटकानि
४२. माला सन्यासी
४३. मांग
४४. मांग गारोडी
४५. मन्ने
४६. मष्टि
४७. मातंगि
४८. मेहतर
४९. मिता अय्यलवार
५०. मुण्डला
५१. पाकि, मोटि, तोटि
५२. पम्बड, पम्बण्ड
५३. पमिडी
५४. पंचम, पेरिया
५५. रेल्लि
५६. सामगार
५७. सम्बन
५८. सप्रु
५९. सिन्दोल्लु, चिन्दोल्लु

### भाग २ रा—आसाम

१. बांस फर
२. भूईमाली, माली
३. बृत्तियाल-बनिया, बनिया
४. धुपी, धोबी
५. डुगला, ढोली
६. हिरा
७. जालकेवट
८. झालो, मालो, झालो-मालो
९. कैवर्त, जालिया
१०. लालबेगी
११. माहरा
१२. मेहतर, भंगी
१३. मुचि, ऋषि
१४. नामशूद्र
१५. पटनी
१६. सूत्रधार

### भाग ३ रा—बिहार

१. बांतर
२. बाउरी
३. भोगता
४. भुइया
५. भूमिज (उत्तर छोटा नागपूर व दक्षिण छोटा नागपूर विभाग आणि संथाळ परगणा जिल्हा वगळून)
६. चमार, मोची
७. चौपाल
८. दबगर
९. धोबी
१०. डोम, धनगद
११. दुसाध, धारी, धरही
१२. धासी
१३. हलालखोर
१४. हाडी, मेहतर, भंगी
१५. कंजर
१६. कुरारियार
१७. लालबेगी
१८. मुसहर
१९. नट
२०. पान, स्वासी
२१. पासी
२२. रजवार
२३. तूरी

## भाग ४ था—गुजरात

१. अगेर
२. बाकड, बंट
३. बावा-डेढ, डेढ-साधु
४. भांबी, भांभी, असादरु, असोदी, चमाडिया, चमार, चांभार, चमगार, हरलय्या, हरली, खालपा, मचिगार, मोचीगार, मादर, मादिग, मोची, नालिया, तेलगु मोची, कामटी मोची, राणीगार, रोहिदास, रोहित, सामगार.
५. भंगी, महतर, ओल्गना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बाल्मीकि, कोरार, झाडमल्ली
६. चलवादि, चन्नय्य
७. चेन्नादासर, होलेय दासर
८. डंगशिया
९. ढोर, कक्कया, कंकय्या
१०. गरमातंग
११. गरोडा, गरो
१२. हल्लीर
१३. हलसार, हसलार, हुलस्वार, हलस्वार
१४. होलार, वल्हार
१५. होलेय, होलेर
१६. लिंगा डेर
१७. महार, तराल, धेगु मेगू
१८. महायावंशी, धेड, धेढ, वणकर, मरुवणकर, अंत्यज
१९. मांग, मातंग, मिणिमादिग
२०. मांग-गारुडी
२१. मेघवल, मेघवाल, मेघवार
२२. मुक्री
२३. नाडिया, हाडी
२४. पासी
२५. सेनवा, शेनवा, चेनवा, सेडमा, रावत
२६. शिमलिया
२७. थोरी
२८. तीरगार, तीरबन्द
२९. तुरी
३०. तुरी बरोत, देढ बरोत

## भाग ५ वा—हरियाणा

१. आद धर्मी
२. बाल्मीकि, चूहड़ा, भंगी
३. बंगाली
४. बराड, बुराड, बेराड
५. बटवाल
६. बौरिया, बावरिया
७. बाजीगर
८. भंजडा
९. चमार, जटिया चमार, रेहगड, रैगड, रामदासी, रविदासी
१०. चनाल
११. डागी
१२. दड़ै
१३. ढेहा, ढैया, ढेआ
१४. धानक
१५. ढोगरी, ढांगरी, सिग्गी
१६. डुमना, महाशय, डूम
१७. गगडा
१८. गंढीला, गण्डील, गोन्दोला
१९. कबीरपंथी, जुलाहा
२०. खटीक
२१. कोरी, कोली
२२. मरीजा, मरेचा
२३. मजहबी
२४. मेघ
२५. नट
२६. ओड
२७. पासी
२८. पेरना
२९. फरेरा
३०. सनहाय
३१. सनहाल
३२. सांसी, भेडकूट, मनेश
३३. सन्सोई
३४. सपेला
३५. सरेडा
३६. सिकलीगर
३७. सिरकीबंद

## भाग ६ वा—हिमाचल प्रदेश

१. आद धर्मी
२. बांढी, नागलू
३. बाल्मीकि, भंगी, चूहडा, चूडा, चूहडे
४. बांधेला
५. बंगाली
६. बंजारा
७. बांसी
८. बरड
९. बराड, बुराड, बेराड
१०. बटवाल
११. बौरिया, बावरिया
१२. बाजीगर
१३. भंजडा, भंजडे
१४. चमार, जटिया चमार, रेहगड, रैगड, रामदासी, रविदासी, रामदासिया मोची
१५. चनाल
१६. छिम्बे, धोबी
१७. दागी
१८. दडै
१९. दराई, दरयाई
२०. दाऊले, दावले
२१. ढाकी, तूरी
२२. धानक
२३. धाओगरी, धुआई
२४. धोगरी, धांगरी, सिग्गी
२५. डूम, डूमना, डुमना, डुमने, महाशा
२६. गगडा
२७. गंधीला, गंडील गोंडोला
२८. हाली
२९. हेसी
३०. जोगी

## भाग ६ वा—हिमाचल प्रदेश—चालू

३१. जुलाहा, जुलाहे, कबीरपंथी, कीर
३२. कमोह, डगोली
३३. करोक
३४. खटीक
३५. कोरी, कोली
३६. लोहार
३७. मरीजा, मरेचा
३८. मजहबी
३९. मेघ
४०. नट
४१. ओड
४२. पासी
४३. पेरना
४४. फ्रेडा, फेरेडा
४५. रेहाड, रेहाडा
४६. सनहाई
४७. सनहाल
४८. सांसी, भेडकूट, मनेश
४९. सन्सोई
५०. सपेला
५१. सरडे, सरेडा, सराडे, सिरयाडे, सरेहडे
५२. सिकलीगर
५३. सिपी
५४. सिरकीबंद
५५. तेली
५६. ठठियार, ठठेरा

## भाग ७ वा—कर्नाटक

१. आदि आंध्र
२. आदि द्रविड
३. आदि कर्नाटक
४. आदीय (कूर्ग जिल्ह्यामध्ये)
५. आगेर
६. आजिला
७. अनामुक
८. आर्वमाला
९. अरुंथथियार
१०. आर्वमाला
११. बैरा
१२. बाकड
१३. बंट (बेळगाव, विजापुर, धारवाड, उत्तर कॅनरा या जिल्ह्यांमध्ये)
१४. बकुडा
१५. बालगाई
१६. बंडी
१७. बंजारा, लंबाणी
१८. बथडा
१९. बेडा जंगम, बुडग जंगम
२०. बेल्लारा
२१. भंगी, मेहतर, ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बाल्मीकि, कोरार, झाडमली
२२. भंबी, भंभी, असादरू, आसोदी, चमडिया, चमार, चंभार, चामगार, हरलय्या, हरली, खलपा, मचीगार, मोचिगार, मादार, मादिग, मोची, मुची, तेलगु-मोची, कामाठि-मोची, राणीगार, रोहिदास, रोहित, सामगार
२३. भोवी
२४. बिडल
२५. ब्यागरा
२६. चक्किलियान
२७. चलावादि, चलवादि, चन्नैया
२८. चांडाल
२९. चेन्नादासर, होल्यादासर
३०. दक्कल, दोक्कलवार
३१. दक्कलिगा
३२. ढोर, कक्कय्या, कंकय्या
३३. डोम, डोम्बर, पैडी, पानो
३४. एल्लमलवार, येल्लम्मलवांडलु
३५. गंटी चोर
३६. गारोडा, गरो
३७. गोड्डा
३८. गोसंगी
३९. हल्लीर
४०. हलसार, हसलार, हुलस्वार, हुलस्वार
४१. हंदी जोगी
४२. हल्ला
४३. होलार, वलहार
४४. होलाय, होलेर, होलेय
४५. होलेयादासरी
४६. जग्गली
४७. जम्बुवुल
४८. कडैयन
४९. कल्लादि
५०. केपमारी
५१. कोलुपुलवाण्डल
५२. कूत्ता
५३. कोरच
५४. कोरम
५५. कोटेगार, मैत्री
५६. कुडुम्बन
५७. कुरवान
५८. लिंगाडेर
५९. मचला
६०. मदारी
६१. मदिग
६२. महार, तराल, धेगु मेगु
६३. माहयावंशी, धेड, वणकर, मारु वणकर
६४. मैला
६५. माल
६६. मालदासरी
६७. मालहन्नाई
६८. मालजंगम
६९. मालमस्ती
७०. मालसाले, नेतकानि
७१. मालसन्यासी
७२. मांग, मातंग, मिनिमादिग
७३. मांग गारुडी, मांग गारोडी
७४. मन्ने
७५. मश्ती

भाग ७ वा—कर्नाटक—चालू

७६. माविलन
७७. मेघवाल, मेंघवार
७८. मोगेर
७९. मुक्री
८०. मुण्डाला
८१. नाडिया, हाडी
८२. नलकडय
८३. नलकेयव
८४. नायाडि
८५. पाले
८६. पल्लन्
८७. पम्बाडा
८८. पंचम
८९. पन्नियंडि
९०. परइयान, परय्या
९१. परवन
९२. राणीयार
९३. समगार
९४. सम्बन
९५. सपरी
९६. सिल्लेकियथस
९७. सिंधोलू, चिंदोलू
९८. सुडुगाडु सिद्ध
९९. तोटि
१००. तीरगार, तीरबन्द
१०१. वल्लुवन

भाग ८ वा—केरळ

१. आदि आंध्र
२. आदि द्रविड
३. आदि कर्नाटक
४. अजिला
५. अरुन्धथियर
६. अय्यनवर
७. बैरा
८. बकुडा
९. बंडी
१०. बथडा
११. बेल्लारा
१२. भरतर
१३. चोयन [ 'राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३७) च्या कलम ५ मधील पोटकलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मलबार जिल्ह्यातील क्षेत्र वगळून ]
१४. चक्किलियान
१५. चमार, मुची
१६. चांडाल
१७. चेरुमन
१८. डोंबन
१९. गवार
२०. गोडागली
२१. गोड्डा
२२. गोसंगी
२३. हस्ला
२४. होलेय
२५. कडैयन
२६. कक्कलन
२७. कल्लाडी
२८. कणक्कन, पदन्न
२९. करिम्पालन
३०. कवर
३१. कूसा
३२. कुटन, कुडन
३३. कुडुम्बन
३४. कुरवन, सिद्धनार
३५. मैला
३६. मलयन [ 'राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३७) याच्या कलम ५ मधील पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मलबार जिल्ह्यातील क्षेत्रां-मध्ये ].
३७. मण्णन
३८. माविलन
३९. मोगेर
४०. मुण्डाला
४१. नलकेयव
४२. नलकाडय
४३. नायाडी
४४. पदन्नन
४५. पल्लन
४६. पल्लुवन
४७. पाम्बाडा
४८. पाणन
४९. पंचम
५०. परैयन, परयन, सांबवर
५१. परवन
५२. पतियन
५३. पेरुमण्णन
५४. पुलयन, चेरमर
५५. पुलय, वेट्टुवन
५६. पुतिरई वण्णन
५७. रणीया
५८. सामगार
५९. सम्बन
६०. सेम्मान
६१. तंडाल
६२. थोटि
६३. वल्लोन
६४. वल्लुवन
६५. वण्णन
६६. वेलन
६७. वेटन
६८. वेट्टुवन

भाग ९ वा—मध्य प्रदेश

१. औघलिया
२. बागरी, बागडी
३. बहना, बाहूना
४. बलाही, बलाई
५. बांछडा
६. वरहर, बसोड
७. वरगुंडा
८. बसोर, बुरुड, बांसोर, बांसोडी, बांसफोड, बसार
९. बेडिया
१०. बेलदार, सूनकर
११. भंगी, मेहतर, बालमीक, लालबेगी, धरकार
१२. भानुमती
१३. चडार
१४. चमार, चमारी, बेरवा, भांबी, जाटव, मोची, रैगड, नोना, रोहिदास, रामनामी, सतनामी, सूर्यवंशी, सूर्यरामनामी, अहिरवार, चमार मंगन, रैदास
१५. चिदार
१६. चिकवा, चिकवी
१७. चितार
१८. दहाइत, दहायत, दहात
१९. देवर
२०. धानुक
२१. धेड, धेड
२२. धोबी (भोपाळमध्ये रायसेन आणि सिहोर या जिल्ह्यांमध्ये)
२३. डोहोर
२४. डोम, डुमार, डोमे, डोमर, डोरिस
२५. गांडा, गांडी
२६. घासी, घसिया
२७. होलिया
२८. कंजर
२९. कातिया, पथरिया
३०. खटीक
३१. कोली, कोरी
३२. कोतवाल, (भिंड, धार, देवास, गुना, ग्वाल्हेर, इंदोर, झाबुआ, खरगोन, मंदसौर, मुरैना, राजगढ, रतलाम, शाजापूर, शिवपुरी, उज्जैन आणि विदिशा या जिल्ह्यांमध्ये)
३३. खंगार, कनेरा, मिरधा
३४. कुचबंधिया
३५. कुम्हारे, (छतरपूर, दतिया, पन्ना, रीवा, सतना, शहडोल, सिधी आणि टिकमगढ या जिल्ह्यांमध्ये)
३६. महार, मेहरा, मेहर
३७. मांग, मांग गारोडी, मांग गारुडी, दखनी मांग, मांग महाशी, मदारी, गारुडी, राधे-मांग
३८. मेघवाल
३९. मोधिया
४०. मुसखान
४१. नट, कालबेलिया, सपेरा, नवदिगार, कुबुतर
४२. पारधी (भिंड, धार, देवास, गुणा, ग्वाल्हेर, इंदोर, झाबुआ, खरगोन, मंदसौर, मुरैना, राजगढ, रतलाम, शाजापूर, शिवपुरी, उज्जैन आणि विदिशा या जिल्ह्यांमध्ये)
४३. पासी
४४. रुज्झार
४५. सांसी, सांसिया
४६. सिलावट
४७. झमराल

भाग १० वा—महाराष्ट्र

१. अनेर
२. अनमुक
३. आरेमाला
४. आरवा माला
५. बहना, बहाना
६. बाकड, बंट
७. बलाही, बलाई
८. बसोर, बुरुड, बांसोर, बांसोडी
९. बेडा जंगम, बुडगा जंगम
१०. बेडर
११. भांबी, भांभी, असादरू, असोदी, चामडिया चमार, चमारी, चांभार, चमगार, हरळय्या, हराळी, खालपा, माचीगार, मोचीगार, मादर, मादिग, मोची, तेलगू मोची, कामाटी मोची, राणीगार, रोहिदास, नोना, रामनामी, रोहित, समगार, सामगारा, सतनामी, सूरज्यबंशी, सूरज्यरामनामी.
१२. भंगी, मेहतर, ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बाल्मिकी, कोरार झाडमल्ली.
१३. बिंदला
१४. ब्यागारा
१५. चलवादी, चन्नय्या
१६. चेन्नदासर, होलया दासर, होलेया दसारी
१७. डक्कल, डोक्कलवार
१८. ढोर, कक्कय्या, कंकय्या, डोहोर
१९. डोम, डुमार
२०. येल्लमलवार, येल्लमलवंडलू
२१. गंडा, गंडी
२२. गरोडा, गारो
२३. घासी, घासीया
२४. हल्लीर
२५. हलसार, हसलार, हुलसवार, हलसवार
२६. होलार, व्हलार
२७. होलय, होलेर, होलेया, होलिया
२८. कैकाडी [अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजुरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा यात]
२९. कटिया, पथरिया
३०. खंगार, कनेरा, मिरधा
३१. खाटिक, चिकवा, चिकवी
३२. कोलूपूल-वंडलू

भाग १० वा—महाराष्ट्र—चालू

३३. कोरी
३४. लिंगडेर
३५. मादगी
३६. मादिगा
३७. महार, मेहरा, तराळ, धेगू-मेगू
३८. माह्यावंशी, धेड, वणकर, मारू-वणकर
३९. माला
४०. माला दासरी
४१. माला हन्नाई
४२. माला जंगम
४३. माला मस्ती
४४. माला साले, नेटकानी
४५. माला संन्यासी
४६. मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारूडी, राधेमांग
४७. मांग गारोडी, मांग-गारूडी
४८. मन्ने
४९. मस्ती
५०. मेघवाल, मेंघवार
५१. मिठा अयलवार
५२. मुक्री
५३. नाडिया, हादी
५४. पासी
५५. सांसी
५६. शेणवा, चेणवा, सेडमा, रावत
५७. सिंधोल्लू, चिंदोल्लू
५८. तिरगार, तिरबंदा
५९. तुरी

भाग ११ वा—मणिपूर

१. धुपी, धोबी
२. लोई
३. मुची, रविदास
४. नामशूद्र
५. पाटनी
६. सूत्रधार
७. यैथिबी

भाग १२ वा—मेघालय

१. बांसफोड
२. भुइनमाली, माली
३. बृत्तियाल बनिया, बनिया
४. धुपी, धोबी
५. डुगला, ढोली
६. हिरा
७. जलकेवट
८. झालो, मालो, झालो-मालो
९. कैबर्त, जालिया
१०. लालबेगी
११. महरा
१२. मेहतर, भंगी
१३. मुची, ऋषि
१४. नामशूद्र
१५. पाटनी
१६. सूत्रधार

भाग १३ वा—ओड़ीसा

१. आदि आंध्र
२. अमान्त, अमात
३. औधेलिया
४. बडैक
५. बाघेटी, बाघुटी
६. बाजीकर
७. बारी
८. बारीकी
९. बासोर, बुरुड
१०. बाऊरी
११. बाऊटी
१२. बावुरी
१३. बेडिया, बेजिया
१४. बेलदार
१५. भाट
१६. भोई
१७. चचटी
१८. चकली
१९. चमार, मोची, मुची, सतनामी
२०. चांडाल
२१. चन्धाई मारु
२२. चेरूआ, छेलिया
२३. दंडासी
२४. देवर
२५. धनवार
२६. धोबा, धोबी
२७. डोम, डोम्बो, डुरीया डोम
२८. दोसधा
२९. गंडा
३०. घंटरघडा, घंटरा
३१. घासी, घसिया
३२. घोगिया
३३. घुसुरिया
३४. गोडागली
३५. गोडारी
३६. गोडरा
३७. गोखा
३८. गोराईत, कोराईत
३९. हाडडी, हाडी, हरी
४०. ईरीका
४१. जग्गली
४२. कंडरा, कंडारा

## भाग १३ वा—उड़ीसा—चालू

४३. काल्आ
४४. कटिया
४५. केला
४६. खडाल
४७. कोडालो, खोडालो
४८. कोरी
४९. कुम्मारी
५०. कुरुंगा
५१. लवाण
५२. लाहेरी
५३. मदारी
५४. मादिग
५५. महुरिया
५६. माला, झाला, मालो, झाला
५७. मांग
५८. मांगण
५९. मेहरा, महार
६०. मेहतर, भंगी
६१. मेवार
६२. मुंडपोट्टा
६३. मुसहर
६४. नगारची
६५. नामशूद्र
६६. पैडी
६७. पैण्डा
६८. पामीडी
६९. पाण, पाणो
७०. पंचम
७१. पाणिका
७२. पंका
७३. पाणतन्ति
७४. पाप
७५. पासी
७६. पटिआल, पाटीकर, पात्रातन्ति, पट्टुआ
७७. रजना
७८. रेल्ली
७९. सबाखिआ
८०. समासी
८१. सनेई
८२. सपरी
८३. सौंतिया, सांतिया
८४. सिधरिआ
८५. सिंदूरिया
८६. सियाल
८७. टमाडिया
८८. टमुडिया
८९. तानला
९०. तियार, तियोर
९१. तुरी
९२. उजीआ
९३. वालमिकी, वाल्मिकी

## भाग १४ वा—पंजाब

१. आद धर्मी
२. वाल्मीकि, चूडा, भंगी
३. बंगाली
४. बरड, बुरड, बेरड
५. बटवाल
६. बौरिया, बावरिया
७. बाजीगर
८. भंजडा
९. चमार, जटिया चमार, रेहगड, रैंगढ, रामदासी, रविदासी
१०. चनाल
११. डागी
१२. दडूँ
१३. डेहा, ढैया, ढेया
१४. धानक
१५. ढोगरी, ढांगरी, सिग्गी
१६. डूमना, महाशा, डूम
१७. गगडा
१८. गंढीला, गण्डील, गोण्डोला
१९. कबीरपंथी, जुलाहा
२०. खटीक
२१. कोरी, कोली
२२. मरीजा, मरेचा
२३. मजहबी
२४. मेघ
२५. नट
२६. ओड
२७. पासी
२८. पेरना
२९. फेरेरा
३०. सनहाई
३१. सनहाल
३२. सांसी, भेडकुट, मनेश
३३. संसोई
३४. सपेला
३५. सरैडा
३६. सिकलीगर
३७. सिरकीबंद

## भाग १५ वा—राजस्थान

१. आदि धर्मी
२. अहेरी
३. बादी
४. बागरी, बागडी
५. बैरवा, बेरवा
६. बाजगर
७. बलाई
८. बांसफोर, बांसफोड
९. बावरी
१०. बर्गी, वर्गी, बिर्गी
११. बावरिया
१२. बेडिया, बेरिया

भाग १५ वा—राजस्थान—चालू

१३. भांड
१४. भंगी, चुडा, मेहतर, औलगना, रूखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, वाल्मिकी, वाल्मीकि, कोरार, झाडमाली
१५. बिदाकिया
१६. बोला
१७. चमार, भंभी, बंभी, भंबी, जटिया, जाटव, जाटवा, मोची, रैदास, रोहिदास, रेगड, रैगड, रामदासिया, असादारू, असोदी, चमडिया, चम्भार, चामगार, हरल्या, हराली, खल्पा, मचिगार, मोचीगर, मादर, मादिग, तेलुगु मोची, कामटीमोची, राणीगार, रोहित, सामगार.
१८. चांडाल
१९. दबगर
२०. धानक, धानुक
२१. धानकिया
२२. धोबी
२३. ढोली
२४. डोमा, डोम
२५. गांडिया
२६. गरांचा, गंचा
२७. गारो, गरूड, गुर्डा, गरोडा
२८. गवारिया
२९. गोधी
३०. जीनगार
३१. कालबेलिया, सपेरा
३२. कामड, कामडिया
३३. कंजर, कुंजर
३४. कपाडिया, सांसी
३५. खंगार
३६. खटीक
३७. कोली, कोरी
३८. कूचबंद, कुचबंद
३९. कोरिया
४०. मदारी, बाजीगर
४१. महार, तराल, बेगुमेगु
४२. माहयावंशी, ढेड, ढेडा, वणकर, मारू वणकर
४३. मजहबी
४४. मांग, मातंग, मिनीमादिग
४५. मांग गारोडी, मांग गारूडी
४६. मेघ, मेघवाल, मेघवल, मेंघवर
४७. मेहर
४८. नट, नुट
४९. पासी
५०. रावल
५१. सालवी
५२. सांसी
५३. संतिया, सतिया
५४. सरभंगी
५५. सरगडा
५६. सिंगीवाला
५७. थोरी, नायक
५८. तीरगर, तीरबंद
५९. तुरी

भाग १६ वा—तामिळनाडु

१. आदि आंध्र
२. आदि द्रविड
३. आदि कर्नाटक
४. आजिला
५. अरूंततियार
६. अय्यनवर (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये)
७. बैरा
८. बकुडा
९. बंडी
१०. बेल्लरा
११. भरतर (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये)
१२. चक्किलियन
१३. चलवादि
१४. चमार, मुची
१५. चांडाल
१६. चेरुमान
१७. देवेन्द्रकुलथन
१८. डोम, डोम्बारा पैडी, पानो
१९. डोक्वान
२०. गोडागली
२१. गोड्डा
२२. गोसंगी
२३. होलेय
२४. जग्गाली
२५. जम्बुवुलु
२६. कडइयन
२७. कक्कलन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये).
२८. कल्लादि
२९. कनक्कन, पाडन्ना (निलगिरी जिल्ह्यामध्ये)
३०. करिम्पालन
३१. कावरा (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये)
३२. कोलियन
३३. कूसा
३४. कूटन, कूडन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये)
३५. कुडुम्बन
३६. कुरवन, सिद्धनार
३७. मदारी
३८. मादिग
३९. मैला
४०. माल
४१. मन्नन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये).
४२. माविलान

### भाग १६ वा—तामिळनाडु—चालू

४३. मोगर
४४. मुण्डाला
४५. नलकेयव
४६. नायाडी
४७. पडन्नन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये)
४८. पगडै
४९. पल्लन
५०. पल्लुवन
५१. पमवाडा
५२. पानन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये)
५३. पंचम
५४. पन्नाडी
५५. पन्नियाडी
५६. परैयन, परयन, साम्बवर
५७. परवन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये).
५८. पथियन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये)
५९. पुलयन, चेरमार
६०. पुंदिरै वन्नन
६१. राणीयार
६२. सामगार
६३. साम्बन
६४. सपरी
६५. सेम्मन
६६. तण्डन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये).
६७. थोटि
६८. तिरुवल्लुवर
६९. वेल्लन
७०. वल्लुवन
७१. वन्नन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये)
७२. वातिरियन
७३. वेलन
७४. वेटन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये)
७५. वेट्टियान
७६. वेट्टुवन (कन्याकुमारी जिल्ह्यामध्ये आणि तिरुनेलवेली जिल्ह्याच्या शेंकोट्टा तालुक्यामध्ये).

### भाग १७ वा—त्रिपुरा

१. बागदी
२. भुईमाली
३. भुनर
४. चमार, मूची
५. दानदासी
६. धेनुअर
७. धोबा
८. डूम
९. घासी
१०. गौर
११. गुर
१२. जैलेया कैबर्त
१३. कहार
१४. कालिंदी
१५. कान
१६. कन्दा
१७. कनुह
१८. केवत
१९. खादित
२०. खारिया
२१. कोच
२२. कोयर
२३. कोल
२४. कोरा
२५. कोटाल
२६. माहिष्यदास
२७. माली
२८. मेहतर
२९. मुसहर
३०. नामशूद्र
३१. पाटनी
३२. सबर

### भाग १८ वा—उत्तर प्रदेश

१. अगरिया
२. बधिक
३. बादी
४. बहेलिया
५. बैगा
६. बैसवार
७. बजनिया
८. बाजगी
९. बलहार
१०. बलाई
११. बालमीकि
१२. बंगाली
१३. बनमानुष
१४. बांसफोड
१५. बरवार
१६. बसोड
१७. बावरिया
१८. बेलदार
१९. बेरिया
२०. भंतू

भाग १८ वा—उत्तर प्रदेश—चालू

२१. भुईया
२२. भुईयार
२३. बोरिया
२४. चमार, धुसिया, शुसिया, जाटव
२५. चेरो
२६. दबगर
२७. धंगड
२८. धानुक
२९. धरकार
३०. धोबी
३१. डोम
३२. डोमर
३३. दुसाध
३४. धरामी
३५. धासिया
३६. गोंड
३७. ग्वाल
३८. हबुडा
३९. हरी
४०. हेला
४१. कलाबाज
४२. कंजर
४३. कपडिया
४४. करवल
४५. खराहा
४६. खरवार (वनवासी व्यतिरिक्त)
४७. खटीक
४८. खोरोट
४९. कोल
५०. कोरी
५१. कोरवा
५२. लालबेगी
५३. मझवार
५४. मजहबी
५५. मुसहर
५६. नट
५७. पंखा
५८. परहिया
५९. पासी, तरमाली
६०. पाटरी
६१. रावत
६२. सहारया
६३. सिनौढिया
६४. सांसिया
६५. शिल्पकार
६६. तुरैहा

भाग १९ वा—पश्चिम बंगाल

१. बागडी, दुले
२. बहेलिया
३. बायती
४. बंतर
५. बौरी
६. बेलदार
७. भोगता
८. भुईमाळी
९. भुईया
१०. बिंद
११. चमार, चर्मकार, मोची, मुची, रविदास, रुईदास, ऋषि
१२. चौपाल
१३. दबगर
१४. दामाई (नेपाळी)
१५. धोबा, धोबी
१६. दोयाई
१७. डोम, धंगड
१८. दोसाध, दुसाध, धारी, धारही
१९. घासी
२०. गोनरही
२१. हलालखोर
२२. हरी, मेहतार, मेहतोर, भंगी
२३. जेलेया कैबत
२४. झालो मालो, मालो
२५. कादर
२६. कामी (नेपाळी)
२७. कांदरा
२८. कंजर
२९. कावरा
३०. करेंगा, कोरंगा
३१. कौर
३२. केवट, केयोट
३३. खैरा
३४. खटीक
३५. कोच
३६. कोनाई
३७. कोनवार
३८. कोटाल
३९. कुरारियर
४०. लालबेगी
४१. लोहार
४२. महार
४३. माल
४४. मल्लाह
४५. मुसहर
४६. नामशूद्र
४७. नट
४८. नूनिया
४९. पलिया
५०. पान, सवासी
५१. पासी
५२. पाटनी
५३. पोद, पौन्ड्रा
५४. राजवंशी
५५. राजवार
५६. शडकी (नेपाळी)
५७. सुनरी (साहा वगळून)
५८. तियर
५९. तुरी".

## दुसरी अनुसूची

(कलम ४ पहा)

### प्रकरण १ ले

"संविधान (अनुसूचित जनजाती) आदेश, १९५० " मध्ये—

(क) परिच्छेद ३ ऐवजी पुढील परिच्छेद घालावा :—

" ३. एखादे राज्य अथवा एखादा जिल्हा किंवा त्याचा अन्य प्रादेशिक विभाग यासंबंधी या आदेशात असलेल्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, १ मे, १९७६ रोजी रचना करण्यात आल्याप्रमाणे ते राज्य, तो जिल्हा किंवा तो अन्य प्रादेशिक विभाग यांचा निर्देश म्हणून लावण्यात येईल." ;

(ख) अनुसूचीऐवजी पुढील अनुसूची घालावी :—

" अनुसूची

भाग १ ला—आंध्र प्रदेश

१. अंध
२. बगटा
३. भील
४. चेंचु, चेंचुवार
५. गडबा
६. गोंड, नायकपोड, राजगोन्ड
७. गौडू (एजन्सीच्या भूप्रदेशांत)
८. हिल रेड्डि
९. जातपू
१०. कम्मर
११. कटुनायकन
१२. कोलम, मन्नेरवर्लू
१३. कोंड दोरा
१४. कोंड कापूस
१५. कोंडा रेड्डी
१६. कोंध, कोंडि, कोंदू, देसेय कोंध, डोंगरिया कोंध, कट्टिया कोंध, टिकिरिया कोंध, येनिटी कोंध
१७. कोटिया, बेंथो ओरिया, बारत्तिका, धुलिया, डुलिया, होल्वा, पैको, पुटिया, सन्रोण, सिधोपैको
१८. कोया, गौड, राजा, राश, कोया, लिंगधारी कोया (सामान्य), कोट्टू कोया, भिणे कोया, राज कोया
१९. कुलिया
२०. माळी (आदिलाबाद, हैद्राबाद, करीमनगर, खम्मम, मेहबूबनगर, मेदक नालगोंदा, निझामबाद व वरंगल जिल्हे वगळून)
२१. मन्ना ढोरा
२२. मुखा ढोरा, नूका ढोरा
२३. नायक (एजन्सी भूप्रदेशांत)
२४. परधन
२५. पोर्जा, परंगीपेर्जा
२६. रेड्डी ढोरा
२७. रोणा, रेणा
२८. सवार, कापु सवार, मालिया सवार, खुट्टो सवार
२९. सुगाली, लंबाडी
३०. थोटी (आदिलाबाद, हैद्राबाद, करीमनगर, खम्मम, मेहबूबनगर, मेदक, नलगोंडा, निझामबाद व वरंगल जिल्ह्यांमध्ये)
३१. वाल्मिकी (एजन्सी भूप्रदेशांत)
३२. येनाडी
३३. येरूकुल

भाग २ रा—आसाम

(एक) स्वायत्त जिल्ह्यांमध्ये—

१. चाकमा
२. डिमासा, कछारी
३. गारो
४. हाजंग
५. ह्मार
६. खासी, जयन्तिया, सिंतेंग, प्नार, वार, भोई, लिंगनागम
७. कोणत्याही कूकी वन्यजमाती, त्यांमध्ये पुढील जमातींचा समावेश आहे :—

(एक) बियाते, बियेते
(दोन) चांगसान
(तीन) चंगलोई
(चार) दौगेल
(पाच) गमल्हो
(सहा) गांगटे
(सात) गुइते
(आठ) हान्नेंग
(नऊ) हौकिप, हौपित
(दहा) हौलाई
(अकरा) हेंगना
(बारा) हंसुघ
(तेरा) हांग्खवाल, रंखल
(चौदा) जंग्वे
(पंधरा) ख्वौचूंग
(सोळा) ख्वौल्लंग, खोतालोंग
(सतरा) खेल्मा
(अठरा) खोल्ह
(एकोणीस) किप्गेन
(वीस) कुकी
(एकवीस) लेथांग
(बावीस) ल्हाघुम
(तेवीस) ल्हाजेम

भाग २रा—आसाम—चालू

(चौवीस) ल्होबुन
(पंचवीस) लुफेंग
(सव्वीस) मांजेल
(सत्तावीस) मिसाउ
(अठ्ठावीस) रिआंग
(एकोणतीस) सैहैम
(तीस) सेल्नाम
(एकतीस) सिंगसन
(बत्तीस) सितल्हो
(तेहतीस) सुक्ते
(चौतीस) थाडो
(पस्तीस) थांग्यू
(छत्तीस) उइबू
(सदतीस) व्हाइफे

८. लाखेर
९. मान (ताई बोली बोलणारे)
१०. कोणतीही मिझो (लुशाई) वन्य जमात
११. मिकिर
१२. कोणतीही नागा वन्य जमात
१३. पावी
१४. सिंतेंग

दोन स्वायत्त जिल्हे वगळून आसाम राज्यामध्ये

१. कछारमध्ये बर्मन
२. बडोकछारी
३. ड्योरी
४. होजाई
५. कछारी, सोन्वाल
६. लालुंग
७. मेच
८. मिरी
९. राभा

भाग ३ रा—बिहार

१. असुर
२. बेगा
३. बनजारा
४. बठुडी
५. बेदिया
६. भूमिज (उत्तर छोटा नागपूर, दक्षिण छोटा नागपूर विभाग व संथाळ परगणा जिल्हा यांमध्ये)
७. बिंझिया
८. बिरहोर
९. बिरजिया
१०. चेरो
११. चिक बराइक
१२. गोंड
१३. गोराइत
१४. हो
१५. करमाली
१६. खरिया
१७. खरवार
१८. खोंड
१९. किसान
२०. कोरा
२१. कोरवा
२२. लोहार, लोहरा
२३. माहली
२४. माल पहाडिया
२५. मुन्डा
२६. उरांव
२७. परहैया
२८. संथाळ
२९. सोरिया पहाडिया
३०. सावर

भाग ४ था—गुजरात

१. बर्डा
२. बावचा, बामचा
३. भरवाड, (अलेच्छ, बराड आणि गीर या जंगलांच्या कडपट्टीच्या प्रदेशात)
४. भील, भील गरासिया, धोली भील, डुंगरी भील, डुंगरी गरासिया, मेवासी भील, रावळ भील, तडवी भील, भगालिया, भिलाला, पावडा, वसावा, वसावे
५. चरण (अलेच्छ, बराडा आणि गीर या जंगलांच्या कडपट्टीच्या प्रदेशात).
६. चौधारी (सुरत व बलसाड जिल्ह्यांमध्ये)
७. चौधरा
८. धनक, तडवी, तेतारिया, वलवी
९. धोडिया
१०. दुबला, तलाविया, हळपती
११. गमित, गम्ता, गविट, मावची, पडवी
१२. गोंड, राजगोंड
१३. कथोडी, काटकरी, ढोर कथोडी, ढोर काटकरी, सोन कथोडी, सोन काटकरी
१४. कोकणा, कोकणी, कुकणा
१५. कोली (कच्छ जिल्ह्यामध्ये)
१६. कोली ढोर, टोकरे कोली, कोल्चा, कोल्था कोली
१७. कुन्बी (डांग जिल्ह्यामध्ये)
१८. नायकाडा, नायेक, चोलीवाला नायक, कपाडिया नायक, मोटा नायक, नाना नायक
१९. पाध
२०. पर्धी (कच्छ जिल्ह्यामध्ये)
२१. पर्धी, अदविचिन्चेर, फांसेपारधी (अमरेली, भावनगर, जामनगर, जूनागढ, कच्छ, राजकोट व सुरेंद्रनगर जिल्हे सोडून)
२२. पटेलिया
२३. पोमला
२४. रबरी (अलेच्छ, बरडा आणि गीर जंगलांच्या कडपट्टीच्या प्रदेशात)
२५. राथवा
२६. सिद्दी (अमरेली, भावनगर, जामनगर, जूनागढ, राजकोट व सुरेन्द्रनगर जिल्ह्यां- मध्ये).
२७. वाघरी (कच्छ जिल्ह्यामध्ये)
२८. वारली
२९. विटोलिया, कोटवालिया, बरोडिया

भाग ५ वा—हिमाचल प्रदेश

१. भोट, बोढ
२. गद्दी [ लाहौल व स्पीती जिल्ह्यांव्यतिरिक्त 'पंजाब पुनर्रचना अधिनियम, १९६६' (१९६६ चा ३१) च्या कलम ५ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली राज्यक्षेत्रे वगळून ]
३. गुज्जर [ 'पंजाब पुनर्रचना अधिनियम, १९६६' (१९६६ चा ३१)-कलम ५ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली राज्यक्षेत्रे वगळून ]
४. जाद, लाम्बा, खम्पा
५. कनोरा, किन्नारा
६. लाहौला
७. पंगवाला
८. स्वांगला

भाग ६ वा—कर्नाटक

१. अदियन
२. बर्डा
३. बवचा, बम्चा
४. भील, भील गरासिया, धोली भील, डुंगरी भील, डुंगरी गरासिया, मेवासी भील, रावल भील, तडवी भील, भगालिया, भिलाला, पवरा, वासव, वासवे
५. चेंचू, चेंचवार
६. चोधरा
७. दुबला, तालाविया, हलपति
८. गामित, गमटा, गावित, मावचि, पदवी, वाल्वी
९. गोंड, नायकपोड, राजगोंड
१०. गोन्डालू
११. हक्कीपिक्की
१२. हासालरु
१३. इरुलर
१४. इरुलिगा
१५. जेनु कुरुबा
१६. काडु कुरुबा
१७. कम्मार (दक्षिण कॅनरा जिल्हा व म्हैसूर जिल्ह्याच्या कोल्लेगाल तालुका यांमध्ये)
१८. कनियन, कन्यान (म्हैसूर जिल्ह्याच्या कोल्लेगाल तालुक्यामध्ये)
१९. काथोडी, काटकरी, ढोर कथोडी, ढोर काटकरी, सोन कथोडी, सोन काटकरी
२०. काट्टू नायकन
२१. कोंकण, कोंकणी, कुक्ना
२२. कोली ढोर, टोकरे कोली, कोल्चा, कोल्घा
२३. कोंडा कापूस
२४. कोरग
२५. कोटा
२६. कोया, भिने कोया, राजकोया
२७. कुडिया, मेलकुडी
२८. कुरुव (कूर्ग जिल्ह्यामध्ये)
२९. कुरुमान
३०. महा मालासार
३१. मलाईकुडी
३२. मालासार
३३. मालायेकान्डी
३४. मालेरु
३५. मराठा (कूर्ग जिल्ह्यामध्ये)
३६. मराटी (दक्षिण कॅनरा जिल्ह्यामध्ये)
३७. मेडा
३८. नायकडा, नायक, चौलीवाला नायका, कपाडिया नायका, मोटा नायक, नाना नायक
३९. पल्लीयान
४०. पानियान
४१. पार्धी, अडविचिंचर, पनसे पार्धी
४२. पटेलिया
४३. राथावा
४४. शोलगा
४५. सोलीगारु
४६. तोडा
४७. वरली
४८. विटोलिया, कोतवालिया, बारोडिया
४९. येरावा

भाग ७ वा—केरळ

१. आडियन्
२. अरांडन
३. अरावालन्
४. हिल पुलया
५. इरुलर, इरुलन्
६. कादर
७. कमारा [ 'राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३७)-कलम ५ च्या पोटकलम (२) द्वारे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मालाबार जिल्ह्यामध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रांमध्ये ]
८. कणिक्कारन, काणिक्कर
९. कट्टुनायकन्
१०. कोच्चूवेलन
११. कोंडा कापूस
१२. कोंडरेड्डि
१३. कोरग
१४. कोटा
१५. कुडीया, मेलाकुडी
१६. करचिचान्
१७. कुरुमन्
१८. कुरुम्बा
१९. महामालासार
२०. मलय अर्यन
२१. मलय पंडारम्
२२. मलय वेडन
२३. मलकुर्वन
२४. मालासार

भाग ७ वा—केरळ—चालू

२५. मलयन [ 'राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३७) कलम ५ च्या पोटकलम (२) द्वारे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मालाबार जिल्ह्यामध्ये समाविष्ट असलेली क्षेत्रे वगळून ]

२६. मलयरयर

२७. मनान्

२८. माराटि (कन्नोर जिल्ह्याच्या होसडुग आणि कासरगोड तालुक्यांमध्ये)

२९. मुतुवान, मुडुगर, मुडुवन

३०. पल्लेयान

३१. पल्लियान

३२. पल्लियार

३३. पाणियन्

३४. उल्लाडन

३५ उरालि

भाग ८ वा—मध्य प्रदेश

१. अगरिया

२. आन्ध

३. बैगा

४. भैना

५. भारिआ भूमिआ, भुईआर, भुमियां, भुमिआ, भारिया, पालिहा, पांडो

६. भतरा

७. भील, भिलाला, वरेला, पटलिया

८. भील मीना

९. भंजिया

१०. बिआर, बीआर

११. बिझवार

१२. बिरहुल, बिरहोर

१३. दमोर, दामरिया

१४. धनवार

१५. गडाबा, गडबा

१६. गोंड, अरख, आरख, अगरिया, असुर, बडी मारिया, बडा मारिया, भटोला, भीमा, भुता, कोईलाभुता, कोलियाभुती, भार, बिसोनहार्न, मारिया, छोट मारिया, दण्डामी मारिया, धुरु, धुरवा, धोबा, दुलिया, डोरला गायकी, गट्टा, गट्टी, गैटा, गोंड गोवारी, हिल मारिया, कंडरा, कलंगा, खटोला, कोईतर-कोया, खिरवार, खिरवारा, कुचा मारिया, कुचाकी मारिया, माडिया, मारिया, माना, मन्नवार, मोघ्या, मोगिया, मोंघ्या, मुडिया, मुरिया, नगरची, नागवंशी, ओझा, राज, सोंझारी झरेका, थाटिया, थोट्या, वाडे माडिया, बडे माडिया, दराई

१७. हलबा, हलबी

१८. कमार

१९. कारकू

२०. कवर, कॅवर, कौर, चेरवा, राठिया, तनवर, छत्री

२१. कीर (भोपाळ, रायसेन व सिहोर जिल्ह्यांमध्ये)

२२. खरवार, कोंदर

२३. खरिया

२४. कोंध, खोंड, कांध

२५. कोल

२६. कोलम

२७. कोरकू, बोपची, मावसी, निहाल, नाहुल, बोंधी, बोंडेया

२८. कोरवा, कोडाकू

२९. मांझी

३०. मझवार

३१. मवासी

३२. मीना (विदिशा जिल्ह्याच्या सिरोज उपविभागामध्ये)

३३. मुंडा

३४. नगेसिया, नागासिया

३५. उरांव, धानका, धनगड

३६. पनिका (छतरपुर, दतिया, पन्ना, रिवा, सतवा, शाहडोल, सिधी व टिकमगढ जिल्ह्यांमध्ये)

३७. पाव

३८. परधान, पथारी, सरौती

३९. पारधी (भोपाळ, रायसेन, सिहोर जिल्ह्यांमध्ये)

४०. पारधी, बहेलिया, बहेल्लिया, चिता पारधी, लंगोली पारधी, फांसे पारधी, शिकारी, टक्नकर, टाकिया

[ (१) बस्तर, छिंदवाडा, मंडला, रायगढ, सिवनी आणि सरगुजा जिल्हे, (२) बालाघाट जिल्ह्याचा बेहर तालुका, (३) बैतूल जिल्ह्याचे बैतूल व भैसंदेही तालुके, (४) बिलासपूर जिल्ह्याच्या बिलासपूर व कोटधोरा तहसिली, (५) दुर्ग जिल्ह्याचे दुर्ग व बलोड तहसिली, (६) राजनंदगाव जिल्ह्याच्या चौकी, मानपूर आणि महाला महसूल निरीक्षकांची मंडले, (७) जबलपूर जिल्ह्याच्या मुरवारा, पाटन व सिहोर तहसिली, (८) होशंगाबाद जिल्ह्याच्या होशंगाबाद व सुहागपूर तहसिली आणि नरसिंहपूर जिल्हा, (९) खांडवा जिल्ह्याच्या हरसूद तहसिली, (१०) रायपूर जिल्ह्याच्या बिंद्रा-नवगढ, धमतरी व महासमुन्द तहसिली यामध्ये ]

४१. परजा

४२. सहारिया, सहारिआ, सेहरिआ, सहरिया, सोसिया, सोर

४३. साओंता, सौंता

४४. सौर

४५. सावर, सवरा

४६. सोनर

## भाग ९ वा—महाराष्ट्र

१. आंध
२. बैगा
३. बरडा
४. बावचा, बामचा
५. भैना
६. भारिया, भूमिया, भुईनहार-भूमिया, पांडो
७. भात्रा
८. भिल, भिल गरासिआ, ढोली भिल, डुंगरी भिल, डुंगरी गरासिया, मेवासी भिल, रावल भिल, तडवी भिल, भगालिया, भिलाला, पावरा, वसावा, वसावे.
९. भुंजिया
१०. बिंझवार
११. बिरहुल, बिरहोर
१२. चोधरा (अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ, औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्हे सोडून).
१३. धाणका, तडवी, तेतारिया, वळवी
१४. धनवार
१५. धोडिया
१६. दुबळा, तलाविया, हलपति
१७. गामित, गामटा, गावित, मावची, पाडवी
१८. गोंड किंवा राजगोंड, आरख, अराख, अगारिया, असूर, बडीमारिया, बडामारिया, भाटोला, भिम्मा, भूता. कोइलाभूता, कोइला-भूती, भार, बिसनहोर्न मारिया, छोटा मारिया, दंडामी मारिया, धुरु, धुरवा, धोबा, धुलिया, डोरला, गायकी, गट्टा, गट्टी, गायता, गोंड गोवारी, हिल मारिया, कांदरा, कलंगा खटोला, कोयतार, कोया, खिरवार, खिरवारा, कुच मारिया, कुचकी मारिया, माडिया, मारिया, माना, मन्नेवार, मोघ्या, मोगया, मोंघ्या, मुडिया, मुरिया, नागरची, नाईकपोड, नागवंशी, ओझा, राज, सोनझारी झरेका, थाटिया, थोट्या, वाडेमारिया, वडेमारिया.
१९. हलबा, हलबी
२०. कमार
२१. काथोडी, कातकरी, ढोर काथोडी, ढोर कातकरी, सोन काथोडी, सोन कातकरी.
२२. कवर, कांवर, कोर, चेरवा, राठिया, तन्वर, छट्टी.
२३. खैरवार
२४. खरिया
२५. कोकणा, कोकणी, कुकना
२६. कोल
२७. कोलाम, मन्नेरवारलु
२८. कोळी ढोर, टोकरे कोळी, कोल्चा, कोलघा
२९. कोळी महादेव, डोंगरकोळी
३०. कोळी मल्हार
३१. कोंध, खोंड, कांध
३२. कोरकू, बोपची, मोवासी, निहाल, नहूल, बोंधी, बोंडेया
३३. कोया, भिनेकोया, राजकोया
३४. नगेसिया, नगासिया
३५. नाइकडा, नायका, चोळीवाला नायका, कापडिया नायका, मोटा नायका, नाना नायका
३६. ओरांव, धनगड
३७. परधान, पाथरी, सरोटी
३८. पारधी, आडवीचिंचेर, फांस पारधी, फासे-पारधी, लंगोटी पारधी, बहेलिया, बहेल्लिया, चिता पारधी, शिकारी, टाकणकर, टाकिया.
३९. परजा
४०. पटेलिया
४१. पोमला
४२. राठवा
४३. सवर, सवरा
४४. ठाकूर, ठाकर, का-ठाकूर, का-ठाकर, मा-ठाकूर, मा-ठाकर
४५. थोटी (औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्ह्यात व चंद्रपूर जिल्ह्याच्या राजुरा तहसीलमध्ये).
४६. वारली
४७. विटोलिया, कोटवालिया, बारोडिया

## भाग १० वा—मणिपूर

१. आयमोल
२. एनाल
३. अंगामी
४. चिरु
५. चौथे
६. गंगते
७. हमार
८. कावुई
९. कच्चानागा
१०. खोइराओ
११. कोयरंग
१२. कोम
१३. लैमगैंग
१४. माओ
१५. मराम्
१६. मैरिंग
१७. कोणतीही मिजो (लुशाई) वन्य जमात
१८. मोन्सँग
१९. मायोन
२०. पाइटे
२१. पुरुम
२२. राल्टे
२३. सेमा
२४. सिम्टे
२५. सुहटे
२६. तंगखुल
२७. थाडो
२८. व्हाइफै
२९. जाओ

## भाग ११ वा---मेघालय

१. चाकमा
२. डिमासा, कछारी
३. गारो
४. हाजंग
५. हमार
६. खासी, जैंतिया, सिंतेंग, प्नार, वार, भोई, लिंगाम
७. कोणत्याही कुकी वन्य जमाती
(एक) बियाते, बियेते
(दोन) चंगसान
(तीन) चंगलोई
(चार) दौंगेल
(पाच) गमल्हौ
(सहा) गंगते
(सात) गुइते
(आठ) हैंनंग
(नऊ) हौकिप, हैपित
(दहा) हौलाई
(अकरा) हेंगंना
(बारा) हौनसुध
(तेरा) हांग्खोबाल, रंग्खोल
(चौदा) जंग्बे
(पंधरा) ख्वोचंग
(सोळा) ख्वौल्लंग, खोतालंग
(सतरा) खेल्मा
(अठरा) खाल्हु
(एकोणीस) किपेगन
(वीस) कुकी
(एकवीस) लेथांग
(बावीस) ल्हांगम
(तेवीस) लहाजम
(चोवीस) ल्होबुम
(पंचवीस) लुफेंग
(सव्वीस) मांजेल
(सत्तावीस) मिसाऊ
(अठ्ठावीस) रियांग
(एकोणतीस) सैरहैम
(तीस) सैल्नाम
(एकतीस) सिंगसन
(बत्तीस) सितल्हौ
(तेहेतीस) सुक्ते
(चौतीस) थादो
(पस्तीस) थांग्न्यु
(छत्तीस) उइबू
(सदतीस) व्हाइफै-सहित
८. लाखेर
९. मान (ताई बोली)
१०. कोणतीही मिजो (लुशाई) वन्य जमात
११. मिकिर
१२. कोणतीही नागा वन्य जमात
१३. पावी
१४. सिंतेंग

## भाग १२ वा---उड़ीसा

१. बागडा
२. बैगा
३. बणजारा, बणजारी
४. बाथुडी
५. भौत्तडा, धोतडा
६. भुइया, भूयां
७. भूमिआ
८. भूमिज
९. भुंजीआ
१०. बिंजाल
११. बिंझिआ, बिंझोआ
१२. बिरहोर
१३. बोंडो पोरजा
१४. चेंचु
१५. दाल
१६. देसुआ भूमिज
१७. धारुआ
१८. दिदयी
१९. गादबा
२०. गांडिया
२१. घारा
२२. गोंड, गोंडो
२३. हो
२४. होलवा
२५. जातपु
२६. जुआंग
२७. कंध गोंड
२८. कावार
२९. खडिआ, खडिया
३०. खारवार
३१. खोंड, कोंड, कन्ध, नांगुली कंधा, सीथा कंधा
३२. किसान
३३. कोल
३४. कोल्हा लोहार, कोल-लोहार
३५. कोल्हा
३६. कोली, मल्हार
३७. कोंडादोरा
३८. कोरा
३९. कोरुआ
४०. कुटिआ
४१. कोया
४२. कुली
४३. लोधा
४४. मादिआ
४५. माहालि
४६. मांकिडी
४७. मांकिरडिआ
४८. माटिआ
४९. मिर्धा
५०. मुंडा, मुंडा लोहरा, मुंडा-महाली
५१. मुंडारी
५२. औमनात्या
५३. ओरांव
५४. परेंगा
५५. परोजा
५६. पेंटिया

### भाग १२ वा—उडीसा—चालू

५७. राजुआर
५८. आताळ
५९. सओरा, सवर, सौंरा, सहरा
६०. सबर, लोधा
६१. साऊंती
६२. थारुआ

### भाग १३ वा—राजस्थान

१. भील, भील गरासिया, धोली भील, डुंगरी भील, डुंगरी गरासिया, मेवासी भील, रावल भील, तडवी भील, भगालिया, भलाला, पावरा, वसवा, वसवे
२. भील मीना
३. डामोर, डामरिया
४. धाणका, तडवी, तेतारिया, वलवी
५. गरसिया (राजपूत गरासिया वगळून)
६. काथोडी, कातकरी, ढोर काथोडी, ढोर कातकरी, सोन काथोडी, सोन कातकरी
७. कोकना, कोकनी, कुकणा
८. कोली ढोर, टोकरे-कोली, कोलचा, कोलघा
९. मीना
१०. नायकडा, नायक, चोलिवाला नायक, कपाडिया नायक, मोटा नायक, नाना नायक
११. पटेलिया
१२. सेहारिया, सेहरिया, सहारिया

### भाग १४ वा—तामिळनाडु

१. अडियन
२. अरनाडन
३. एरवल्लन
४. इरुलर
५. काडर
६. कम्मारा (कन्याकुमारी जिल्हा आणि तिरुनेलवेली जिल्ह्याचा शेंकोट्टा तालुका वगळून)
७. कनिकरण, कनिकर (कन्याकुमारी जिल्हा व तिरूनेलवेली जिल्ह्याचा शेंकोट्टा तालुका यामध्ये)
८. कनियन, कन्यन
९. काट्टुनायक्कन
१०. कोचुवेलन
११. कोंडा कपूस
१२. कोंडारेड्डि
१३. कोरागा
१४. कोटा (कन्याकुमारी जिल्हा आणि तिरुनेलवेली जिल्ह्याचा शेंकोट्टा तालुका वगळून)
१५. कुडिया, मेला कुडी
१६. कुरिच्छन
१७. कुरुम्बास (निलगिरी जिल्ह्यामध्ये)
१८. कुरुमान्स
१९. महा मल्लेसर
२०. मलै अरैयन
२१. मलै पंडाराम
२२. मलै वेडन
२३. मलक्कुरवन
२४. मल्लेसर
२५. मल्याली (धर्मपुरी, उत्तर अर्काट, पुडुकोट्टाई, सलेम, दक्षिण अर्काट आणि तिरुचिरापल्ली जिल्ह्यांमध्ये)
२६. मलयेकंडी
२७. माशन
२८. मुडुगर, मुडूवन
२९. मवुवन
३०. पाल्लयन
३१. पलियन
३२. पल्लयर
३३. पनियन
३४. शोलागा
३५. टोडा (कन्याकुमारी जिल्हा व तिरुनेलवेली जिल्ह्याचा शेंकोट्टा तालुका वगळून)
३६. उरली

### भाग १५ वा—त्रिपुरा

१. भील
२. भुटिया
३. चैमल
४. चकमा
५. गारो
६. हलाम
७. जमातिया
८. खसिया
९. कुकी, पुढील उप-जनजातींसुद्धा :—
(एक) बाल्टे
(दोन) बेललहुत
(तीन) छाल्य
(चार) फुन
(पाच) हजांगो
(सहा) जंगतेई
(सात) खरेंग
(आठ) केफंग
(नऊ) कुन्तेई
(दहा) लाइफंग
(अकरा) लेनतेई
(बारा) मिजेल
(तेरा) नमते
(चौदा) पाइतु, पाइते
(पंधरा) रंगचान
(सोळा) रंखल
(सतरा) थंग्लुया
१०. लेप्चा
११. लुसाई
१२. मग
१३. मुंडा, कौर
१४. नोआतिया
१५. ओरांग
१६. रियांग
१७. सन्थाल
१८. त्रिपुरा, त्रिपुरी, टीपरा
१९. उचई

भाग १६ वा—पश्चिम बंगाल

१. असुर
२. बैगा
३. बेदिया, बिदिया
४. भूमिज
५. भटिया, शेरपा, टोटो, दुकपा, कगाते, तिबेटी, योलमो
६. बीरहड
७. बिर्जिया
८. चाकमा
९. चेरो
१०. चिक बारैक
११. गारो
१२. गोंड
१३. गोडत
१४. हाजंग
१५. हो
१६. करमाली
१७. खारवार
१८. खोंड
१९. किसान
२०. कोडा
२१. कोरवा
२२. लेप्चा
२३. लोधा, खेडिया, खाडिया
२४. लोहारा, लोहरा
२५. मध
२६. माहली
२७. महली
२८. माल पहाडिया
२९. मेच
३०. म्रू
३१. मुंडा
३२. नागेसिया
३३. ओरांव
३४. पाढैया
३५. राभा
३६. सन्थाल
३७. सौरिया पहाडिया
३८. सावर."

## प्रकरण २ रे

"संविधान (अंदमान व निकोबार बेटे) अनुसूचित जनजाती आदेश, १९५९" यामध्ये—

(क) परिच्छेद २ मधील "त्या अनुसूचीमध्ये त्यांच्या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या स्थानिक भागामध्ये रहिवास करणाऱ्या" या शब्दांऐवजी "त्या संघ राज्यक्षेत्रामध्ये रहिवास करणाऱ्या" हे शब्द घालण्यात येतील;

(ख) अनुसूचीऐवजी पुढील अनुसूची घालावी :—

"अनुसूची

१. अंदमानी, चारियर, चारी, कोरा, टाबो, बो, येरे, कोडे, बीय, बालावा, बोजीगियाब, जवाई, कोल.
२. जरावा.
३. निकोबारी.
४. ओंगे.
५. सेंटिनेली.
६. शोम पेन.".